<u>नियमित दिवाणी दावा - ५६७/२०१२</u>

**निशाणी – ८७/क**

| वादी तर्फे साक्षीदार क्रं. २ याचे जबानी, मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की, | |
|---|---|
| माझे नांव – | **आनंद प्रकाश पटवा** |
| वय – | ४२ |
| व्यवसाय – | वकील |
| राहणार – | इचलकरंजी सांगली रोड, राज कॅसल समोर, इचलकरंजी. |

<u>सरतपास वादी तर्फे श्री.पी.ए.उपाध्ये यांचे वतीने सुरु</u>

१. मी सन २००८–२००९ पासून इचलकरंजी शहरामध्ये वकीली करतो. दाव्यातील वादी प्र.वादी यांना मी ओळखतो. यातील वादी माझ्याकडे प्रतिवादीच्या मिळकती संदर्भात खरेदीपुर्व करारपत्र करावयाचे आहे म्हणून आले होते म्हणून मी त्यांना ओळखतो. प्रतिवादीला ओळखण्याचे कारण म्हणजे मी प्रतिवादीच्या घरी मुंबई येथे गेलो होतो.

प्रतिवादीची मिळकत तारदाळ येथे आहे त्याचा ग.नं. ४४३ आहे. सदर करारामध्ये प्रतिवादीचे हे ०.०५.०० आर म्हणजे ५३९५ चौ.फुट इतके क्षेत्र नमुद आहे. सदर करार करण्यापुर्वी वादी प्रतिवादीची चर्चा झाली, त्यानंतर मी कागदपत्रे पाहिली, त्यानंतर त्यांना किंमत किती टाकायची हे विचारुन अॅडव्हान्स किती टाकायचे हे विचारले. वादी प्र.वादी यांच्या विचाराने मी अटी शर्ती मी करारामध्ये नमुद केल्या. सदरचे करारपत्र मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदर कराराकरीता स्टॅम्प विवेक भुपाल कट्टी यांनी आनला आहे. सदर करारपत्र माझ्या हस्ताक्षरात लिहीलेले आहे. सदर करारपत्र लिहीन्याकरीता मी अंधेरी, मुंबई येथे गेलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत संजय साळुंखे, इस्माईल पटेल, राजू नेमिष्टे व कांबळे नावाची व्यक्ती होते. अंधेरी मुंबई येथे सरस्वती कट्टी व विवेक कट्टी यांच्या घरी गेलो. त्यांच्या घरी चर्चाकरुन करारपत्र टाईप करण्याकरीता जवळपास टायपिंगची सोय नसल्याने ते मी हाताने लिहीले. साक्षीदाराला नि. ३६ वरील सदर करारपत्र दाखविले असता ते तेच असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांची सही मसुदा तयार करणार म्हणून असल्याचे सांगीतले. त्या मिळकतीची मोबदला रक्कम ३,४६,१५०/– रुपये इतकी ठरलेली होती. त्यापैकी र.रु. १,३०,०००/– साळुंखे यांनी कट्टी यांना संचकार म्हणून दिली. त्यातील अटी व शर्ती साक्षीदाराने खुल्या न्यायालयामध्ये वाचून त्या त्यावेळी लिहील्याप्रमाणे असल्याचे

सांगीतले. त्यावरील सह्या माझ्या समक्ष केल्या. त्यावर विना स.पाटील व इस्माईल बापू पटेल यांच्या साक्षीदार म्हणून सह्या आहेत. त्याप्रमाणे माझ्या समक्ष व्यवहार झाला व तो करारात नमुद आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण**

**वादी तर्फे साक्षीदार २ यांचा उलटतपास प्र.वादी तर्फे एस.बी.खंजीरे यांचे तर्फे सुरु.**

हे खरे आहे की नि. ३६ करीता वापरलेला स्टँम्प व स्टँम्प व्हेंडर इचलकरंजी येथील आहे. हे मला माहिती नाही की इचलकरंजी येथील सदर स्टँम्प व्हेंडर यांना स्टँम्प इचलकरंजी येथे विक्री करण्याचा अधिकार आहे. मी सदर स्टँम्प व्हेंडरला कोठे स्टँम्प विक्री करण्याचा अधिकार आहे याची चौकशी केलेली नाही. हे खरे आहे की नि. ३६ वर विवेक भूपाल कट्टी आज मुक्कामी इचलकरंजी असे नमुद नाही. सदर स्टँम्प खरेदी करणार म्हणून माझ्या समक्ष सदर व्यक्तीने सही केलेली नाही. हे मी सांगू शकत नाही की सन २०१० मध्ये आधार कार्ड व पॅन कार्ड अस्तीत्वात होते. नि. ३६ वरील स्टँम्प वर तो स्टँम्प दिनांक ११/१०/२०१० रोजी खरेदी केला अशी तारीख नमुद आहे. हे खरे आहे की नि. ३६ वर सदर स्टँम्प इचलकरंजी येथे विक्री केला असे नमुद आहे.

**प्रश्न** – दिनांक – ११/१०/२०१० रोजी विवेक भुपाल कट्टी यांचे वय साधारण ४५ वर्ष होते ?

**उत्तर** – त्यांनी सांगीतले त्या प्रमाणे लिहीले. ती व्यक्ती वयस्कर होती.

हे खरे आहे की मी विवेक कट्टी यांच्याकडे ओळख दाखविणारी आधार कार्ड व पॅनकार्डची मागणी केलेली नाही. हे खरे आहे की दिनांक ११/१०/२०१० पुर्वी मी विवेक कट्टी यांना ओळखत नव्हतो. मला विवेक कट्टी यांनी मुंबई येथे करारपत्र करण्यासाठी या म्हणून बोलावले नव्हते. मी विवेक कट्टी यांना ते कुठल्या खात्यात सेवा करत होते या बाबत विचारणा केलेली नाही. हे खरे आहे की मी आतापर्यत कमीत कमी १०० खरेदीखत व खरेदीपुर्व करारपत्र लिहीलेले आहेत. खरेदीपत्र किंवा खरेदीपुर्व करारपत्रासाठी साधाराणता ७/१२, खरेदीखत व डायरी उतारे पहातो. तथाकथीत नि.३६ वरील करारपत्राला ७/१२ उतारा जोडलेला नाही. हे खरे आहे की नि. ३६ वरील तथाकथीत करारपत्रात ७/१२ उतारा पाहिला असे नमुद नाही. तथाकथीत नि. ३६ वरील करारपत्रातील ग.नं. ४४३ च्या चर्तुसिमा मी जागेवर मी

प्रत्यक्ष जावुन खात्री केलेले नाही. नि. ३६ वरील करारपत्र मध्ये नमुद मिळकत ग.नं. ४४३ चा ७/१२ उतारा मी पाहिला की नाही हे मला आठवित नाही. हे खरे नाही की नि ३६ वरील करारपत्र मी त्यात नमुद मिळकतीचा ७/१२ उतारा न पहाता केलेला आहे. हे मला आठवत नाही की नि. ३६ वरील करारपत्रातील मिळकतीवर समाईक वहिवाट अशी नोंद होती. हे खरे आहे की सन २०१० मध्ये हातकणंगले तालुक्यामध्ये बागायती २० आर व जिरायत ४० आर कमी असल्यास ती तुकडा मिळकत होती. हे खरे आहे की नि. ३६ मधील मिळकत त्यादिवशी गुंठेवारी किंवा बिगर शेती झालेली नव्हती. साक्षीदाराला नि. ३६ वरील करारपत्र दाखविले असता त्यातील मिळकत ग.नं. ४४३ वर सदर कराराचे दिवशी विवेक कट्टी यांचे नांव ७/१२ पत्रकी नव्हते हे निश्चीत आठवत नसल्याचे सांगीतले. हे खरे नाही की बापू निगवेकर यांचे खरेदीखत मला त्यावेळी दाखविले नाही. हे खरे आहे की नि. ३६ च्या करारपत्रासोबत त्यातील मिळकतीचा ७/१२ उतारा, लिहून देणार व घेणार यांचे ओळखपत्र जोडण्यास मला अडचण नव्हती. हे खरे आहे की धनंजय विलासराव घोरपडे हे माझ्यासोबत मुंबई येथे आले नव्हते. हे खरे आहे की नेमिष्ठे व कांबळे यांच्या नि ३६ वर सह्या नाहीत. हे खरे आहे की संजय साळोंखे हे प्लॉट, जमीन खरेदीविक्रीचे दलाल आहेत. हे खरे आहे की दिनांक ११/१०/२०१० पुर्वी माझी विवेक कट्टी, विना पाटील, इस्माईल पटेल व संजय साळोंखे यांची मिटींग झाली नव्हती व नि ३६ मधील मिळकतीच्या खरेदीविक्री बाबत चर्चा झाली नव्हती. नि ३६ मधील मिळकत खरेदी व विक्रीबाबत वादी प्र.वादी यांच्यातील चर्चा कोठे झाली हे त्यामध्ये नमुद नाही. नि. ३६ मध्ये नमुद मोबदला र.रु. ३,४६,१५०/– ठरवण्याकरीता करारापुर्वीची मला माहिती नव्हती. हे खरे नाही की सदर करारामध्ये मोबदला रक्कम रुपये ३,४६,१५०/– ठरल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की सन २०१० साली वीस हजारापेक्षा जास्त रक्कम द्यावयाची झाल्यास ती परकाम्यलेखाने द्यावी लागत होती. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी कोणता वार होता हे मला सांगता येत नाही.

हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मी आंधेरी मुंबई येथे गेल्याचे खोटे सांगतो. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी आंधेरी मुंबई येथे नि. ३६ चा करार मी लिहील्याचे खोटे सांगतो. हे खरे नाही की नि. ३६ वर करारपत्र लिहून देणार म्हणून विवेक

कट्टी यांची सही नाही. विवेक कट्टी आंधेरी मुंबई येथील कोणत्या भागात राहत होते ते मी आत्ता सांगु शकत नाही. साक्षीदार सांगतो दिपश्री बिल्डींग मध्ये राहतो. दिपश्री बिल्डींग कोणत्या भागात येते हे मला आठवित नाही. हे खरे आहे की आता मला दिपश्री येथे जायचे झाल्यास मी रस्ता सांगु शकत नाही. हे खरे नाही की मी विना पाटील, इस्माईल पटेल, साळोखे व धनंजय घोरपडे यांनी संगनमताने नि. ३६ वरील बोगस करारपत्र तयार केलेले आहे. खोतवाडी व तारदाळ हि लगतची गांवे आहेत. इस्माईल पटेल खोतवाडी येथे राहतो. संजय साळोंखे हा तारदाळ येथे राहतो. धनंजय घोरपडे व मी इचलकरंजी येथे राहतो. हे खरे आहे की संजय साळोंखे यांची बरेच खरेदीखत मी लिहीलेली आहेत. हे खरे नाही की माझे व वादीचे मैत्री व सलोख्याचे संबंध आहेत. हे खरे आहे की नि. ३६ वरील तथाकथीत करारपत्र लिहीला त्यावेळी करारपत्रातील मिळकत हि तुकडा जमीन होती. मी वादी संजय साळोंखे याला तुकडा मिळकतीचे खरेदीखत होत नाही असे सांगीतले होते. हे खरे नाही की मी मुंबई येथे गेलो व तेथे दावामिळकत खरेदी विक्रीची चर्चा झाली, दावा मिळकतीचा मोबदला विचारला, त्याप्रमाणे करारात नमुद केला हे खोटे सांगतो. हे खरे नाही की नि. ३६ करीता स्टॅम्प विवेक कट्टी यांनी आणल्याचे मी खोटे सांगत आहे. दिनांक ११/१०/२०१० रोजी विवेक कट्टी इचलकरंजी येथे आला होता की नाही याची मला कल्पना नाही. याची कल्पना नाही सन २०१० मध्ये अंधेरी मुंबई येथे टायपिंग व झेरॉक्सची सोय होती. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी वादी ची १,३०,०००/– ची ऐपत नव्हती व त्याच्याकडे ती रक्कम नव्हती. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी वादीने विवेक कट्टीला र.रु. १,३०,०००/– दिली नाही. हे खरे नाही की वादीला मदत करायची म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**दोन्ही विधिज्ञांच्या संमतीने पुढील उलटतपास तहकूब करणेत आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**sd/–**

**(डॉ.डी.जी.पटवे )**

**दिनांक – १९/१०/२०२४** **स.दि.न्या.क.स्तर, इचलकरंजी.**